**गोपनीय/अतितात्काळ**

क्र. पोमसं/२/१०२०/निनिसु २०१५-१६/५०/१६
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ११/०४/२०१७
92

**संदर्भ :-** शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे- ०११६/प्र. क्र. १८९ (३) /पोल १ (अ), दिनांक ०७/०४/२०१७ (प्रत संलग्न केली आहे).

**विषय:-** **पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नतीने पदस्थापना ...**

----ooo----

पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सन २०१५-१६ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या **श्री. रामेश्वर प्रल्हाद धोरण, पोलीस निरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, अमरावती ग्रामीण** यांना **पोलीस उप अधीक्षक, समाजकल्याण अमरावती विभाग** या पदावर पदोन्नतीने पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश शासनाने कळविले आहेत.

२. तरी घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ)** उपरोक्त शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास पाठवावा.

**आ)** पदोन्नती आदेशाधिन अधिकाऱ्यास नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कृपया तात्काळ कार्यमुक्त करून, त्यांना कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख तांतडीने या कार्यालयास कळवावी. तसेच, प्रस्तुत अधिका-यांविरूध्द आता गुन्हा दाखल झाला असेल, किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा प्रस्तुत अधिका-यास निलंबित केले असल्यास त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी. तसेच, उपरोक्त अधिकाऱ्याविरुध्द विभागीय /संक्षिप्त/ प्राथमीक चौकशी/ न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबीत /प्रस्तावीत असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या, दि. ०२.०४.१९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदींनुसार, त्यांच्याविरुध्द प्रलंबीत/ प्रस्तावीत / संक्षिप्त/ प्राथमीक चौकशीअंति त्यांना शिक्षा झाल्यास, सदर शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करावे. पदोन्नतीवरील अधिकारी जर नेमणुकीच्या ठिकाणी वेळीच हजर झाला नाही, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरूद्ध या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६.०९.१९८३, ११.०१.१९८४ व

१०.०२.१९९१, तसेच क्र. पोमसं /३/५५०७/६/९७, दिनांक १३.०२.१९९७ च्या परिपत्रकांतील सूच-ांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

इ) उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची, व पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राची प्रत कृपया सत्वर या कार्यालयास पाठवावी.

ई) संबंधीत कार्यक्षेत्रात निवडणूक आचारसंहिता चालू असेल तर निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर सदर अधिका-यास पदोन्नतीवरील नियुक्तीवर कार्यमुक्त करावे.

उ) ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही न्यायालयाचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सोबतच्या आदेशांन्वये पदस्थापना झाली असेल तर अशा न्यायालयीन आदेशांचा अवमान होणार नाही, याचीही दक्षता घेण्यात यावी.

ऊ) उपरोक्त अधिकाऱ्यास देण्यात आलेली पदोन्नती, मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र. २७९७/२००४, व याचिका क्र.२७०/२००५ मधील अतिम निर्णयाच्या तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

ए) उपरोक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देताना, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा अन्य न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देण्यात यावी.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना )
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (सस्नेह)
पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण
विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती (सस्नेह)

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३
( **लक्षवेधः- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर

जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती

प्रत :-

विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३, ९, ११, १४-अ, ३६ व ४०
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

<u>निवडसूची सन २०१५-१६.</u>
पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-०११६/प्र.क्र.१८९(३)/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-७ एप्रिल, २०१७.

<u>वाचा</u> :- पोलीस आस्थापना मंडळ क्र.१ यांची चक्रीय पध्दतीने केलेली शिफारस.

<u>शासन आदेश</u> :-

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१५-१६ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षक संवर्गातील खालील अधिकाऱ्यास "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २८.४.२०१५ आणि दि. १६.७.२०१५ रोजीच्या, अधिसूचनेतील तरतुदीनुसार महसुली विभागीय संवर्गाचे वाटप करण्यात आले आहे. सदर महसुली विभाग वाटपानुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | निशस्त्र पोलीस : निरीक्षक या पदावरील नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. रामेश्वर प्रल्हाद धोरण | अमरावती | पोलीस उप अधीक्षक, समाज कल्याण, अमरावती विभाग |

२. उपरोक्त अधिकाऱ्याविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती त्यांना शिक्षा झाल्यास, सदर शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

502
11-4-17